PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Gauri
Year: 2006

Song: Angapindan Pildar Gadi
Lyricist: Jagdish Khebudkar

अंगापिंडानं पिळदार गडी
ही जात अशी रांगडी
हा...
अंगापिंडानं पिळदार गडी
ही जात अशी रांगडी
करू लढाई गरीबीसंग
ही फौज राहीली खडी
आन् लळा लावतंय लाडकं कोकरू
लळा लावतंय लाडकं कोकरू
कावरं बावरं
बावरं बावरं
माय-बाप मेंढरं न्
आमी त्यांची लेकरं
गं माय-बाप मेंढरं न्
आमी त्यांची लेकरं
आमी आमच्या मनाचं राजं
शिंवासन साधं
घोंगडी हाथरली खाटल्यावर
हे हा...हे हा...हे हा...
माय-बाप मेंढरं न्
आमी त्यांची लेकरं
रामाच्या पारी ललकारी

राब राबून करूया काम
काळ्या मातीत गाळू घाम
राब राबून करूया काम
काळ्या मातीत गाळू घाम
नगं शिरमंतीचा तोरा
पोटापुरतं मिळवू दाम

अमृताची दावील गोडी
अमृताची दावील गोडी
कांदा भाकर
भाकर भाकर
हे माय-बाप मेंढरं न्
आमी त्यांची लेकरं
माय-बाप मेंढरं न्
आमी त्यांची लेकरं
आमी आमच्या मनाचं राजं
शिंवासन साधं
घोंगडी हाथरली बांधावर
हे हा...हे हा...हे हा...
हे... माय-बाप मेंढरं न्
आमी त्यांची लेकरं
रामाच्या पारी ललकारी हां...

मुक्या जीवाची माया न्यारी
भल्या भल्याना पडंल भारी
मुक्या जीवाची माया न्यारी
भल्या भल्याना पडंल भारी
थंडी वारा न पावसामंदी
काय सांगू मी जादूगिरी
आन् ऊब देतीया मानसाला
हो...
ऊब देतीया मानसाला
मखमाली लोकरं
लोकरं लोकरं
माय-बाप मेंढरं न्
आमी त्यांची लेकरं

Literacy for a Billion

माय-बाप मेंढरं न्
आमी त्यांची लेकरं
आमी आमच्या मनाचं राजं
शिंवासन साधं
घोंगडी हाथरली दगडावर
हे हा...हे हा...हे हा...
माय-बाप मेंढरं न्
आमी त्यांची लेकरं
माय-बाप मेंढरं न्
आमी त्यांची लेकरं
माय-बाप मेंढरं न्
आमी त्यांची लेकरं
माय-बाप मेंढरं न्
आमी त्यांची लेकरं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*